**नि.दि.दा.क्र. १९४/२०१५**

**निशाणी ९७ खालील आदेश**

(बंडू गव्हाणे वि. भिमराव गव्हाणे)

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीतर्फे कैफीयत दुरुस्ती हुकूमाप्रमाणे कैफीयत दुरुस्त करणेस विलंब झाल्यामुळे कैफीयत दुरुस्तीस परवानगीसाठी केला आहे.

२. प्रतिवादीच्या कथनानुसार प्रतिवादी हे कामानिमीत्त परगावी गेलेले असल्यामुळे वेळेत दुरुस्ती करता आलेली नाही. त्यामुळे कैफीयत दुरुस्तीस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. सदरच्या अर्जावर वादीतर्फे म्हणणे दिले की, दि. ३१/०७/२०१८ रोजी प्रतिवादीचा कैफीयत दुरुस्तीचा अर्ज दाखल होता. सदर अर्जावर दि. ०४/०५/२०२२ रोजी आदेश झालेला आहे. त्याप्रमाणे कैफीयत दुरुस्ती करणे आवश्यक होते. परंतु, प्रतिवादींनी दाव्याचे कामकाज लांबवण्यासाठी कैफीयत दुरुस्ती केली नाही. प्रतिवादीचा अर्ज खोटा व लबाडीचा आहे. प्रतिवादी दुरुस्तीसाठी किती दिवसांचा विलंब झाला याचा उल्लेख केलेला नाही. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. सदरच्या अर्जावर दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा हा सरस निरस मानाने वाटप होऊन मिळणेचा व पृथ्थक कब्जाचा आहे. प्रतिवादी क्र.४२ तर्फे प्रतिदावा निशाणी ५८ कडे दाखल आहे. प्रतिवादी क्र. ४२ यांची मागणी सरस निरस मानाने वाटप होऊन पृथ्थक कब्जा मिळणेची आहे. तसेच प्रतिवादीच्या कैफीयत दुरुस्तीचा अर्ज मंजूर झाल्याचे दिसुन येते. परंतु, प्रतिवादींनी मुदतीमध्ये कैफीयत दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत दाखल

केलेली नाही हे अभिलेखावरुन स्पष्ट होते. अशा परिस्थितीत, दाव्याचे व प्रतिदाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादीस सदरची दुरुस्ती करण्यास परवानगी देणे आवश्यक वाटते. सदर मागणी मंजूर न केल्यास पक्षकारांमध्ये भविष्यात गुंतागूंत निर्माण होणार आहे. सदर मागणी मंजूर करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य आहे. तसेच प्रतिवादींनी आदेशाची पूर्तता करण्यास केलेल्या विलंबाचा खर्च प्रतिवादींवर ठेवणे योग्य आहे. त्यामुळे प्रस्तूतचा अर्ज मंजूर केल्याने वादी किंवा प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज (नि.१८) प्रतिवादींनी वादीना खर्चाची रक्कम रु. ४००/–पुढील तारखेपर्यंत देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी अर्जात मागणी केल्याप्रमाणे दुरुस्ती करुन कैफीयत दुरुस्तीची प्रत पुढील तारखेपर्यंत दाखल करावी.

SEEMA KETAN DESHMUKH
Digitally signed by SEEMA KETAN DESHMUKH
Date: 2023.03.17 17:27:43 +0530

( सौ. एस. के. देशमुख )

दिनांक – १७/०३/२०२३

दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
सांगोला.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S. P. Parekar |
| (b) | Court | : | Mrs. S. K. Deshmukh,<br><br>Civil Judge, J.D.& J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgement /Order signed by P.O. on | : | 17/03/2023 |
| (d) | Judgement /Order uploaded on | : | 17/03/2023 |